# ‘एचपीएल ग्रुप’चे मॉड्युलर स्विचेस निर्मिती क्षेत्रात पदार्पण

पुणे : भारतीय विद्युत क्षेत्रातील बडा समूह असलेल्या ‘एचपीएल ग्रुप’ने विस्ताराचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला असून त्याअंतर्गत देशभर उपलब्ध असलेल्या आपल्या सध्याच्या उत्पादन श्रेणीत मॉड्युलर स्विचेस व खास सुट्या भागांची भर घातली आहे.

यासंदर्भात पुणे दौऱ्यावर असलेले समूहाचे सह व्यवस्थापकीय संचालक गौतम सेठ म्हणाले, की ‘एचपीएल’ने नेहमीच सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान सादर करुन ग्राहकांना संतुष्ट राखण्यावर भर दिला आहे. आम्ही सादर केलेली स्मार्ट मॉड्युलर स्विचेसची नवी श्रेणी ही याचेच पुढचे पाऊल आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर




करुन बनवलेले हे आकर्षक स्विच चोखंदळ ग्राहकांना नक्कीच पसंत पडावेत, अशीच त्यांची रचना करण्यात आली आहे.

ग्राहकांना सर्वोत्तम उत्पादने देण्याची परंपरा कायम राखण्यासाठी ‘एचपीएल’ने २ नवे उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी १२० कोटी रुपये गुंतवणूक केली आहे. हे प्रकल्प ४०००० चौरस फूट क्षेत्रात विस्तारलेले असून तेथे प्रगत विद्युत उपकरणे बनवली जातील. यातील एक प्रकल्प केवळ स्विचगिअर्स, लायटिंग व ल्युमिनरीजसाठी राखीव असून दुसरा प्रकल्प हा इलेक्ट्रॉनिक एनर्जी मीटर विभागाचा विस्तार आहे. या व्यवसाय विस्तारातून पुढील ३ वर्षात १५०० कोटी रुपये उलाढालीचा टप्पा गाठण्याचे समूहाचे ध्येय आहे.

‘एचपीएल’चे शाखा प्रमुख अमित भंडारे म्हणाले, की पुणे विभागात एचपीएलने समाधानकारक प्रगती केली असून आता मॉड्युलर स्विचेस व सुट्या भागांच्या उत्पादनामुळे बाजारपेठेतील वाटा व स्थान अधिक भक्कम होण्याची अपेक्षा आहे.